L2



महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ९ इमारत, बिडको नाका,
नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर

दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११
Email ID : collectorpalghar@gmail.com

---

वाचले:-

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधीलकलम ३४ व ५१ (b)
२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र/करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेलीअधिसुचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
५) या कार्यालयाचे आदेश क्र.जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/शॉपिंग मॉल/दुकाने/आदेश/कावि-२०४/२० दि.१४/०३/२०२०

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

---

क्र/जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/दुकाने/आदेश/कावि- २२७ /२० दि.१७/०३/२०२०

## आ दे श

ज्याअर्थी राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी राज्यातील सर्व शॉपिंग मॉलमधील सर्व दुकाने व आस्थापना (अत्यावश्यक किराणा सामान (Grocery), दुध व भाजीपाला व अन्य जीवनावश्यक वस्तू व औषधालय (Chemist Shop) वगळून) दि.३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्यात याव्यात. सदर आदेशसाथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत याव्दारे सुचित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये शासन अधिसुचनेनुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

त्याअर्थी मी **डॉ.कैलास बा. शिंदे, जिल्हाधिकारी पालघर तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पालघर** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधीलकलम ३४ व उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये शासन अधिसूचनेनुसार मला पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून निर्गमित केलेल्या अधिकाराचा वापर करुन **पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रकारच्या वस्तूंचे दुकाने, बियर/वाईन शॉप, सर्व देशी दारूचे दुकाने व आस्थापना (अत्यावश्यक किराणा सामान (Grocery), दुध, फळे, भाजीपाला, औषधालय (Chemist Shop) व अन्य जीवनावश्यक वस्तू वगळून) दि.१७/०३/२०२० ते दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याचे आदेश देत आहे.**

उक्त आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधितांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन

अधिनियम २००५ मधील ५१(b), भारतीय दंडसंहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ व भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ नुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश आज दि.१७/०३/२०२० रोजी माझेसही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-xxx**
(डॉ.कैलास बा.शिंदे)
**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**

**प्रत:-**

१) मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार कॉम्प्लेक्स बिल्डींग, नवीन मंत्रालय, मुंबई-४००००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
४) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७) उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
९) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१०) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
११) जिल्हा क्रिडा अधिकारी पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१२) शिक्षणाधिकारी, (प्राथमिक/माध्यमिक),जि.प. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१३) मुख्याधिकारी, नगरपरीषद पालघर/डहाणू/जव्हार यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१४) मुख्याधिकारी, नगरपंचायत वाडा/विक्रमगड/तलासरी/मोखाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१५) जिल्हा महिती अधिकारी पालघर यांना आवश्यक त्या प्रसिध्दीकरीता.
१६) पोलीस निरीक्षक (सर्व) पालघर जिल्हा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

जिल्हाधिकारी पालघर तथा
अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन
प्राधिकरण, पालघर